जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्वगुण विकासासाठी कृतिकार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता – एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

मेटकर वसंत आनंदराव

मार्गदर्शक

डॉ . माने मारुती शिवराम

संशोधन केंद्र

शिक्षण शास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

2021

अनुक्रमणिका

1. प्रस्तावना
2. संशोधनाची गरज व महत्व
3. समस्येचे विधान
4. कार्यात्मक व्याख्या
5. संशोधनाची उदिष्टे
6. गृहीतक
7. व्याप्ती, मर्यादा व परिमर्यादा
8. परिकल्पना
9. संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा
10. संशोधन पद्धती
11. जनसंख्या
12. नमुना
13. माहिती संकलनाची साधने
14. माहिती विश्लेषणाची साधने
15. प्रकरण योजना
16. कालावधी
17. संदर्भ ग्रंथ सुची

1. प्रस्तावना :–

'यथा राजा तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे क्षेत्र कोणतेही असो जो पुढे होवून कार्य करतो त्याच्याकडे नेतृत्व गुण असायलाच हवे. नेतृत्वाची जबाबदारी लादली असो संधी मिळाली असो अथवा स्वतःहून प्रयत्न करून नेतृत्व स्वीकारले असो, नेतृत्वाला स्वतःला सिद्ध करावे लागते. शाळेचे नेतृत्व मुख्याध्यापक करत असतो. विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही शाळेवर अवलंबून आहे. मुख्याध्यापक व शिक्षक शाळेतील उपलब्ध भौतिक व अभौतिक साधनांचा यथोचित वापर करून विद्यार्थ्यांना स्वतःचा विकास साधण्यास मदत करण्यावर भर देतात. काही पूर्व संशोधने अजय बाबू आणि मंदाकिनी कुमार (2013), Mei Teh, Goi (2013), Hallie A. Buckingham(2014) Agnes Ebi Maliki (2013), J. vangeline Cynthia (2013), Dr. Roshan lal, sarabjit singh shergill (2012), Yener ÖZE (2013), Stephen T. Bond(2013), Rahim (2013), Vashu (2013) and Dickens (2013) या गत संशोधनाच्या निष्कर्षानुसार मुख्याध्यापक, शिक्षकांचा सहभाग व समायोजन, व्यक्तिमत्त्व , शिक्षकाची अभिवृत्ती यांचा धन सहसबंध दिसून येतो. विद्यार्थ्यांची गुणवत्ता मुख्याध्यापक व शिक्षकाच्या भूमिकेवर अवलंबून आहे. शाळेचा विचार चार महत्त्वाच्या घटकांच्या संदर्भात होतो. पहिला घटक अभ्यासक्रम हा आहे. अभ्यासक्रम निर्मितीचा व शाळेचा प्रत्यक्ष संबंध नसला तरी निर्माण केलेल्या अभ्यासक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी मुख्याध्यापकला करावी लागते. दुसरा घटक सामाजिक संरचना आहे. शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी हा भविष्यातील समाजात उपयुक्त नागरिक बनणार असतो. समाजाला शाळेची गरज असते. विद्यार्थी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक हे सर्व घटक मिळून शाळेची एक सामाजिक प्रणाली बनते. यातील सर्व घटकांमध्ये असणारे संबंध, होणाऱ्या अंतरक्रिया अलिखित शिष्टाचाराच्या भाग असतो. तिसरा घटक अध्ययनाठी आवश्यक उपलब्ध साधने व चौथा घटक प्रशासन हा आहे. शाळेचे मुख्याध्यापक शाळेचे नेतृत्व करतात. ज्याप्रमाणे गाडीवरील चालकाचे नियंत्रण सुटले तर अपघात होतो, त्याचप्रमाणे मुख्याध्यापकाच्या नेतृत्वाचा परिणाम हा शाळेवर पडत असतो. शाळेचे उत्तरदायित्व हे मुख्याध्यापकाकडे असते. त्यामुळे शाळेतील बहुतांश कामे मुख्याध्यापक स्वतः करण्याचा प्रयत्न करतो. त्याऐवजी मुख्याध्यापकांनी सहकारी शिक्षकांना कामाची विभागणी करून दिली तर ते अधिक योग्य होईल. एक प्रकारे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न मुख्याध्यापकाने करणे अपेक्षित असते. मग ही विभागणी व्यक्तीनुसार असो अथवा समिती अनुसार असो. शिक्षक अध्यापन करत असलेला विषय विद्यार्थ्यांनी आत्मसात होण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षकास मार्गदर्शन करतो. या आधुनिक युगात विद्यार्थ्यांबाबतच्या मानसशास्त्रीय गरजा व सामाजिक गरजा समजून अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करतो. योग्य सामाजिक अभिवृत्ती ठेवतो. सामाजिक परिवर्तनासाठी मुख्य घटक बनतो. तसेच शिक्षकीपेशाबाबत सकारात्मक अभिवृत्ती ठेवतो. शिक्षकाला शाळेत अध्यापन कार्याबरोबरच शालेय प्रशासनात सहभागी होणे आवश्यक असते. ज्यासाठी शिक्षकाकडे नेतृत्व गुण असणे गरजेचे आहे. संशोधक स्वतः शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर कार्यरत आहे. या पदावर कार्य करताना बहुतांश शिक्षकांशी संपर्क येतो. त्यातूनच शिक्षकांची शालेय नेतृत्वाबाबतचा अभ्यास करण्याची उत्सुकता वाटली व याच हेतूने काही कृतिकार्यक्रम तयार करून त्याची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

2. संशोधनाची गरज व महत्व :–

संशोधनाची गरज –

अ) प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्व गुणाच्या सद्यस्थितीची माहिती मिळेल.

आ) प्राथमिक शिक्षकांना नेतृत्व गुणांच्या घटकांची माहिती देता होईल.

इ) प्राथमिक शिक्षकांमध्ये नेतृत्व गुणांच्या रुजववणूकीसाठी कृतिकार्यक्रम तयार करता येईल.

संशोधनाचे महत्व

अ) प्राथमिक शिक्षकांना नेतृत्व गुणांच्याबाबत स्वतःबाबत अधिक माहिती समजेल.

आ) नेतृत्व गुणांच्याबाबत शिक्षकांमध्ये जागृती निर्माण होईल.

इ) नेतृत्व गुण विकास साधायला मदत मिळेल.

ई) सेवांतर्गत व सेवापूर्व अभ्यासक्रमात प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्व गुणांसाठी आवश्यक घटकांचा समावेश करता येईल.

3. समस्येचे विधान :-

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्वगुण विकासासाठी कृतिकार्यक्रम निर्मिती व परिणामकारकता – एक अभ्यास

4. कार्यात्मक व्याख्या :-

अ) **प्राथमिक शिक्षक** :- जिल्हा परिषद स्थानिक स्वराज्य संस्थेत प्राथमिक स्तरावर अध्यापन करणारी व्यक्ती म्हणजे प्राथमिक शिक्षक होय.

आ) **नेतृत्व गुण :-** सर्वांसोबत सुसंवाद ठेवून सर्वांच्या विकासासाठी अभ्यासपूर्ण व प्रामाणिकपणे निर्णय घेण्याचा गुण म्हणजे नेतृत्व गुण होय.

इ) **कृतिकार्यक्रम निर्मिती:-** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्वगुणाच्या विकासासाठी प्रारूप तयार केले जाईल ज्यामध्ये शिक्षकांचा कृतियुक्त सहभाग घेतला जाईल.

ई) **परिणामकारकता** : जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्वगुण विकासासाठी कृतिकार्यक्रम निर्मिती केल्यानंतर नियंत्रित गट व प्रायोगिक गट यामधील उत्तर चाचणीद्वारे केलेली पडताळणी म्हणजे परिणामकारकता होय.

5. संशोधनाची उदिष्टे :-

सदरील संशोधनामध्ये संशोधक खालील उद्दिष्टांनुसार संशोधन करणार आहे.

१. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या नेतृत्व गुणांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२. जिल्हा परिषदेतील शिक्षकांमध्ये नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम तयार करणे.

३. नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम राबविणे.

४. जिल्हा परिषदेतील शिक्षकांमध्ये नेतृत्व गुणांच्या विकासासाठी राबविलेल्या कृतीकार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

6. गृहीतक :-

१. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या नेतृत्व गुण असतात.

२. जिल्हा परिषदेतील शिक्षकांमध्ये नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम निर्मिती केली जावू शकते.

(आधार- **SABEENA P. S.,** Development of Leadership Training Module and Its Effect on Selective Variables Related to Leadership Qualities of Pre Service Teachers, या अभ्यासातून असे दिसून आले आहे.)

7. व्याप्ती व मर्यादा :-

संशोधनाची व्याप्ती

अ) क्षेत्रव्याप्ती :- प्रस्तुत संशोधन नांदेड जिल्हयापुरते व्यापक आहे.

आ) आशय व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन हे जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांपुरते व्यापक आहे.

इ) घटक व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन हे जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या नेतृत्व गुण या घटकापुरते व्यापक आहे.

ई) कालव्याप्ती :– प्रस्तुत संशोधन 2022 ते 2025 या दरम्यान पुर्ण केले जाईल.

संशोधनाची मर्यादा :–

अ) क्षेत्रमर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्हयापुरतेच मर्यादित आहे.

आ) आशय मर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

इ) घटक मर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे प्रस्तुत संशोधन हे जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या नेतृत्वाचा अभ्यास करण्यापुरते मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतीसादकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असतील.

परिमर्यादा :– प्रस्तुत संशोधन हे पुढील घटकांसाठी परीमर्यादित आहे.

अ. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतील शिक्षकांपुरतेच मर्यादित असतील.

ब. प्रस्तुत संशोधनात शिक्षकांच्या नेतृत्व गुणाचा अभ्यास अपेक्षित असेल.

8. संशोधन परिकल्पना व शून्य परिकल्पना :–

संशोधन परिकल्पना

१. जिल्हा परिषदेतील शिक्षकांमध्ये नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम राबवल्यानंतर नेतृत्व गुणांमध्ये लक्षणीय परिणाम आढळतो.

शून्य परिकल्पना –

२. जिल्हा परिषदेतील शिक्षकांमध्ये नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम राबवल्यानंतर नेतृत्व गुणांमध्ये फरक पडत नाही.

9) संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

संबंधित साहित्याचा आढावा

A) आ. वि.कापरे, 2010,शैक्षणिक व्यवस्थापन, फडके प्रकाशन, कोल्हापूर (पान क्रमांक 170)

(अ) नियोजनविषयक कर्तव्ये :– नियोजनाने कोणतेही कार्य प्रभावीपणे करता येते, नियोजन करणे हे मुख्याध्यापकाचे महत्त्वाचे काम आहे. शाळेतील वर्षभराच्या नियोजनाचे चार टप्पे पडतात.

१. शाळा सुरू होण्यापूर्वीचे नियोजन, शाळेच्या पहिल्या दिवसाचे व पहिल्या आठवड्याचे नियोजन, त्यानंतर वर्षकालातील नियोजन करावे लागते. विद्यार्थी संख्या विचारात घेऊन तुकड्या, वर्ग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्तीसंबंधीचे नियोजन करावे लागते.

२. शालेय वर्षाचा प्रथम दिवस महत्त्वाचा मानला जातो. शालेय परिसर स्वच्छ व आकर्षक कसा होईल याचा विचार करावा लागतो. समसंख्या विद्यार्थ्यांचे वर्ग, विषयासाठी शैक्षणिक साहित्य, विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रक, वेळापत्रक, प्रार्थना, राष्ट्रगीत, सुविचार इत्यादी कामे नियमित होण्याची दखल घेणे.

३. शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रम व कार्य यांची दोन सत्रात विभागणी केली जाते . विद्यार्थी गुणवत्ता वाढीचे उपक्रम व आर्थिक बाबींचे नियोजन करावे लागते.

४. शेवटच्या टप्प्यात वार्षिक परीक्षेची तयारी, निकाल पत्रके, प्रगतीपुस्तके, वार्षिक अहवाल, शाळा सोडल्याचे दाखले इत्यादी बाबींचा समावेश होतो.

(ब) संघटन व प्रशासनविषयक कर्तव्ये :

१. विद्यार्थी व वर्गव्यवस्था , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कामाची विभागणी , अभ्यासानुवर्ती कार्यक्रम – उपक्रम व अन्य कामाचे संघटन व प्रशासन करावे लागते.

२. कार्यालयीन कामकाज पाहणे , कार्यालयीन कामाची कर्मचारी वर्गात योग्य विभागणी करणे , वेळोवेळी पत्रव्यवहार करणे , नोंदी ठेवणे , अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी...

३. शालेय वास्तू व परिसर स्वच्छ , आरोग्यपूर्ण ठेवणे हे मुख्याध्यापकाचे कर्तव्य आहे . इमारतीची सुसज्ज्ता , दुरुस्ती , नूतनीकरण , स्वच्छता , पाणी इत्यादी घटकांकडे काटेकोर लक्ष दिले पाहिजे.

४. शाळेच्या कार्यक्षम व्यवस्थापनाबाबत जबाबदार राहून विद्यार्थ्यांची उपस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे .

(क) शिक्षकाची कर्तव्ये / कार्ये:– पान क्रमांक 184

1. शिक्षकाने स्वतःशी संबंधित विद्यार्थ्यांच्या कार्यक्षम व परिणामकारक शिक्षणास जबाबदार असावे.

2. नियमाप्रमाणे आठवड्यातून किमान १७ ते १ ९ तास अध्यापनाचे काम करणे, पाठांचे टाचण तयार करणे व अध्यापनाचे नियोजन करणे.

3. नियमितपणे शाळेत उपस्थित राहावे. अध्यापन वर्गाच्या कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे . महिन्याच्या शेवटच्या दिवशी जास्तीतजास्त तीन तासांत महिन्याचे रजिस्टर पूर्ण करून नवीन महिन्याचे रजिस्टर लिहावे आणि मुख्याध्यापकांच्या आवश्यकतेनुसार त्यांचा अहवाल लिहिण्यास मदत करावी.

4. शाळेतील उपस्थिती कायम राहील आणि तिच्यात सुधारणा होईल असे सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

5. विद्यार्थ्यात स्वच्छता, टापटीप, शिस्तबद्ध वागण्याबाबत आदर निर्माण करणे व शिस्तीसाठीआखलेल्या कार्यक्रमात भाग घेणे.

6. विद्यार्थ्यांत आपापसात जातीय ऐक्य व सदिच्छा वाढीस लावाव्यात. धर्म,जात व समुदाय या आधारांवर विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची विषमता लादली जाणार नाही याकडे लक्ष द्यावे.

7. मुख्याध्यापकांच्या आदेशाप्रमाणे रिकाम्या तासावर उपस्थित राहणे व निकडीनुसार ग्रंथालयाचे काम पाहणे.

8. विविध स्पर्धा, क्रीडा इत्यादींकरिता विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे, वह्या व उत्तरपत्रिका तपासणे, परीक्षांचे निकाल तयार करून ते मान्यतेसाठी मुख्याध्यापकांकडे सादर करणे.

9. विविध प्रदर्शने, हस्तलिखित मासिके इत्यादींसारख्या विविध शैक्षणिक कार्याची योजना आखणे व ती कार्यान्वित करणे.

10. मुख्याध्यापक, सहायक मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या आदेशानुसार शाळेची सर्व शैक्षणिक व संबंधित कामे करणे.

11. नवीन शैक्षणिक वर्ष आरंभ झाल्यानंतर शक्यतो एका आठवड्याच्या आत विषयानुसार वार्षिक युनिट योजना तयार करणे.

प्रस्तुत साहित्याच्या अभ्यासातून मुख्याध्यापकांची नियोजनविषयक कर्तव्ये तसेच संघटन व प्रशासनविषयक कर्तव्ये याबाबतची माहिती मिळाली.

B) अरविंद दूनाखे, 2008 ,शालेय व्यवस्थापन, प्रशासन, संघटन व नियोजन , नित्य नूतन प्रकाशन, कोल्हापूर

अ) शिक्षकाची कर्तव्ये – (इ.स. १ ९ ७८ मधील निर्देश व त्यातील सुधारणानुसार) **पान क्रमांक 43**

१) शिक्षकाने स्वतःशी संबंधित विद्यार्थ्यांच्या कार्यक्षम व परिणामकारक शिक्षणास जबाबदार असावे.

२) नियमितपणे शाळेत उपस्थित रहावे व ठरविलेल्या तासांत शाळेत उपस्थित असावे . अध्यापन व वर्गाच्या कामावर सर्व लक्ष केंद्रीभूत करावे . महिन्याच्या शेवटच्या दिवशी तीन तासापेक्षा जास्त नसलेल्या वेळात पूर्ण झालेल्या महिन्याचे रजिस्टर पूर्ण करण्यात व नवीन महिन्याचे रजिस्टर लिहिण्यात व मुख्याध्यापकांच्या आवश्यकतेनुसार अहवाल लिहिण्यात घालवावे.

३) हजेरी घेऊन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद करावी.

४) शाळेतील उपस्थिती कायम राहील आणि तिच्यात सुधारणा होईल असे सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

५) स्वतःच्या अखत्यारीतील विद्यार्थ्यांकडून, असल्यास फी गोळा करावी व प्रमुखाने आदेश दिल्यानुसार जमविलेल्या फीचा भरणा करावा.

६) मुख्याध्यापकाने सांगितल्यानुसार आवश्यक रजिस्टर व इतर नोंदी अचूकपणे व व्यवस्थितपणे ठेवण्यास जबाबदार असावे.

७) विशिष्ट कालावधीतील व वार्षिक परीक्षा, तसेच अभ्यासपूरक कार्यक्रम अशा शालेय कार्यक्रमांच्या आखणीत प्रमुखाने सांगितल्या प्रमाणे प्रमुखास मदत करावी.

८) विद्यार्थ्यांत स्वच्छता , टापटीप , शिस्तशीर वागण्याबाबत आदर निर्माण करणे व यासाठी आखलेल्या कार्यक्रमात भाग घेणे, या सवयी विद्यार्थ्यांत लावण्याबाबत जबाबदार असावे.

ब) मुख्याध्यापकाची कर्तव्ये :– पान क्रमांक 28

इ. स. १९७८ च्या १९९३ पर्यंतच्या सुधारलेल्या नियमानुसार महाराष्ट्र सरकारने मुख्याध्यापकांची कर्तव्ये निश्चित केली आहेत. ती खाजगी स्तरावरील सर्व शाळांना लागू आहेत. त्या पैकी काही महत्त्वाची कर्तव्ये पुढे दिली आहेत.

शैक्षणिक बाबींसंबंधी कर्तव्ये :

– स्वतः शिकवीत असलेल्या वर्गांबाबत जबाबदार असणे.

– शारीरिक शिक्षणासह अन्य शिक्षण कार्यक्षमतेने व परिणामकारक देण्यासाठी जबाबदार रहाणे.

– शाळेत नियमितपणे उपस्थित रहाणे, शाळेच्या सर्व वेळांत शाळेत उपस्थित रहाणे. संपूर्ण लक्ष शाळेच्या कामाकडे देणे व शाळेच्या वेळात दुसरे कोणतेही काम न करणे.

– शिक्षकांच्या कामात नियमितता आणणे व त्यावर नियंत्रण आणणे व शाळेतील शिक्षणात दर्जा प्राप्त करण्यासाठी स्थूल रूपरेखा पुरविणे.

– स्कूल समितीच्या सल्ल्याने पाठ्यपुस्तके, हस्तपुस्तिके व कार्य पुस्तिके निश्चित करणे.

– उद्बोधन वर्गास उपस्थित रहाणे व ते यशस्वी रित्या पूर्ण करणे.

शालेय प्रशासनीय बाबतीत कर्तव्ये :

– शाळेच्या कार्यक्षम कार्याबाबत (व्यवस्थापनास) जबाबदार असणे.

– शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती सुधारण्यासाठी शक्यतो सर्व प्रयत्न करणे. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. पालकांना त्यांची मुले शाळेत नियमितपणे उपस्थित रहाण्यासाठी आकर्षित करणे, शाळेत गैरहजर रहाणाऱ्या मुलांच्या पालकांशी अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने संपर्क स्थापणे, अनुपस्थितीबाबत, वा अनियमित उपस्थितीबाबत चौकशी करणे.

– शिक्षणाधिकाऱ्यांनी तयार केलेल्या कार्यक्रमानुसार शाळेचे कार्यदिवस व सुट्ट्या निश्चित करणे व शाळेचे वार्षिक वेळापत्रक तयार करणे.

– सर्व शालेय रजिस्टरे व नोंदी योग्य रीतीने ठेवण्यास जबाबदार रहाणे.

–खेळ व क्रीडा, विशिष्ट मुदतीतील परीक्षा व अभ्यासपूरक कार्यक्रम यांच्या संघटनेबाबत जबाबदार रहाणे .

अशारितीने सदर साहित्यातून शिक्षकाच्या व मुख्याध्यापकाच्या जबाबदाऱ्या कर्तव्य विषयक माहिती मिळते.

संबंधित संशोधनाचा आढावा:–

A) Kotennnavar Gayatri R, A Study of Attitude towards Teaching Profession to Secondary School Teachers Participation in School Administration Adjustment and Personality,Ph.D. Karnataka State Womens University, 2017

उद्दिष्टः–

1. स्त्री व पुरुष शिक्षकांचा शिक्षक व्यवसायबाबत अभिवृत्ती, शालेय प्रशासनातील सहभाग समायोजन व व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण व शहरी भागातील शिक्षकांचा शालेय प्रशासनातील सहभाग, समायोजन, व्यवसायबाबतची अभिवृत्ती व व्यक्तिमत्त्वातील फरकाचा अभ्यास करणे.

परिकल्पना :– स्त्री व पुरुष शिक्षकांचा शालेय प्रशासनातील सहभाग , समायोजन, व्यक्तिमत्व व शिक्षकी व्यवसायबाबतच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

न्यादर्शन :– यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने 600 माध्यमिक शिक्षकांची निवड केली.

साधन :– शिक्षकांचा सहभाग अभ्यासण्यासाठी डॉ. हसीन ताज यांनी विकसित केलेली पदनिश्चयन श्रेणी वापरण्यात आली. शिक्षकांची अभिवृत्ती अभ्यासण्यासाठी अभिवृत्ती मापिका तयार करण्यात आली.

निष्कर्ष :–

1. स्त्री व पुरुष यांच्या अभिवृत्तीमध्ये विशेष फरक दिसून आला नाही.
2. ग्रामीण व शहरी भागातील शिक्षकांचा शालेय प्रशासनातील सहभाग, समायोजन, व्यक्तिमत्त्व व व्यवसायबाबतची अभिवृत्ती याबाबत सहसंबंध दिसून आला.

Kotennnavar Gayatri R यांनी केलेल्या संशोधनात शिक्षक व्यावसायाबाबतच्या अभिवृत्तीचा अभ्यास केलेला आहे पण प्रस्तुत संशोधनात शिक्षकांच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास अपेक्षित असेल.

B) **SABEENA P. S.,** Development of Leadership Training Module and Its Effect on Selective Variables Related to Leadership Qualities of Pre Service Teachers, Tamil Nadu Teachers Education University,2018

उद्दिष्ट :– 1. सेवापूर्व प्रशिक्षणासाठी नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

2. सेवापूर्व प्रशिक्षणातील उपक्रमातील सहभागी व सहभागी नसलेल्या शिक्षकांच्या नेतृत्व गुणांची तुलना करणे.

संशोधन पद्धती :– प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण व प्रायोगिक या दोन पद्धतींचा अवलंब केलेला आहे

न्यादर्श कलकत्ता विद्यापीठातील बीएडच्या 160 विद्यार्थ्यांचा समावेश केलेला आहे, ज्यामध्ये चार गट (40 X 4) आहेत.

निष्कर्षः–

1. सेवापूर्व प्रशिक्षण आतील उपक्रमातील सहभागी व सहभागी नसलेल्या शिक्षकांच्या नेतृत्व गुणांची तुलना केली असता दोघांमध्ये विशेष फरक आढळतो.

SABEENA P. S. यांनी केलेल्या संशोधनात शिक्षकांच्या नेतृत्व गुणांच्या सद्यस्थितीचा अभ्यास केलेला आहे पण प्रस्तुत संशोधनात शिक्षकांच्या नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम निर्मिती करून परिणामांचा अभ्यास अपेक्षित असेल.

C) V. GANESAN, (2015), A Study On Leadership Quality Among School Teachers,Ph.D.(Edu.), Teachers Education University, Chennai

उद्दिष्ट :– शाळेतील शिक्षकांमधील नेतृत्व गुणांचा शोध घेणे

परिकल्पना :– शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेच्या संदर्भात नेतृत्वगुणांचा मध्यमानात विशेष फरक आढळत नाही.

संशोधन पद्धती:– वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर प्रस्तुत संशोधनामध्ये केलेला आहे.

साधन:– डॉ. हसीन ताज (2001) यांनी विकसित केलेली नेतृत्वगुण पदनिश्चयन श्रेणी वापरण्यात आलेली आहे.

निष्कर्ष :– 1. स्त्री, पुरुष (शिक्षक), शैक्षणिक पात्रता, अध्यापन अनुभव यासंदर्भात नेतृत्व गुणात कमी अधिक प्रमाणात फरक आढळून येतो.

2. स्त्री शिक्षकाडे पुरुष शिक्षकांपेक्षा अधिक नेतृत्व गुण आहेत.

V. GANESAN **यांनी केलेल्या संशोधनात** वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा **वापर करून** नेतृत्व गुणाचा **अभ्यास केलेला आहे पण प्रस्तुत संशोधनात शिक्षकांच्या नेतृत्व गुणांच्या विकासासाठी कृतिकार्यक्रम निर्मिती करून परिणामांचा अभ्यास असेल.**

D) **Natesan, N.** , (2003), Teaching Profession, Perception, Teaching Aptitude, and Personality Factors of Secondary GradeTeachers,Ph.D.(Edu.), Maharshi Dayanand University

उद्दिष्ट :– 1. शिक्षकी व्यवसायाच्या अवबोधाचे, शिक्षक अभियोग्यता व माध्यमिक शिक्षकातील व्यक्तिमत्त्वाच्या घटकांबाबतच्या लिंगभेदाचा अभ्यास करणे.

2. शिक्षकी व्यवसायाच्या अवबोधाचे, शिक्षक अभियोग्यता व माध्यमिक शिक्षकातील व्यक्तिमत्त्वाच्या घटकांबाबतच्या गटांचा (वर्गीकरणाचा) अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:– सर्वेक्षण परीक्षण पद्धती वापरली आहे.

निष्कर्ष :– शिक्षक व मुख्याध्यापकांच्या शिक्षक अभियोग्यतेच्या सर्व क्षेत्रांमध्ये कोणताही फरक आढळला नाही.

Natesan, N. यांनी केलेल्या संशोधनात शिक्षकी व्यवसायाच्या अवबोधाचे, शिक्षक अभियोग्यतेचा अभ्यास केलेला आहे पण प्रस्तुत संशोधनात शिक्षकांच्या नेतृत्व गुणांचा **अभ्यास अपेक्षित असेल.**

10.संशोधन पद्धती :–

प्रस्तुत संशोधनात 'जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या नेतृत्व गुणांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.' या पहिल्या उद्दिष्टासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील सर्वेक्षण पद्धती या संशोधन पध्दतीचा वापर संशोधक करेल. व त्यानंतर प्रायोगिक संशोधन पध्दती वापराली जाईल. ज्यामध्ये नेतृत्व गुणांच्या विकसनासाठीच्या आवश्यक घटकांची माहिती मिळेल, नेतृत्व गुणांसाठी आवश्यक घटकानुरूप प्रयोगाचा कृतिकार्यक्रम तयार करून अभिकल्प ठरवणे, पूर्व चाचणी घेणे प्रयोग राबविणे व अंतिम चाचणीच्या माध्यमातून परिकल्पनांची उकल व निष्कर्ष काढल्यानंतर अहवाल लेखन केले जाईल.

11) जनसंख्या :-

प्रस्तुत संशोधनासाठी जनसंख्या म्हणून महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषद शाळेत अध्यापन करणारे शिक्षक असतील.

12) नमुना :-

सर्वेक्षणासाठी नांदेड जिल्ह्यातील जि. प. प्राथमिक शिक्षकांची एकूण संख्या 9097 आहे, त्यापैकी पुरुष शिक्षक 6504 व स्त्री शिक्षिका 2593 आहेत. ज्यामधून सुगम यादृच्छिक निवड पद्धतीने 1000 शिक्षकांची संशोधक नमुना म्हणून निवड करणार आहे. तर प्रायोगिक गटात नांदेड जिल्ह्यातील 84 बिट मधून 2 बिट व नियंत्रित गटात 2 बिट मधून प्रत्येकी 40 असे एकूण 80 शिक्षकांची संशोधक नमुना म्हणून निवड करणार आहे.

13) माहिती संकलनाची साधने :-

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास करण्यासाठी प्रश्नावली तयार करून प्रमाणित केली जाईल तसेच पूर्व चाचणी व उत्तर चाचणी तयार केली जाईल.

14) माहिती विश्लेषणाची साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राप्त माहितीचे सारनीकरण करून परिमाण निश्चित केले जाईल. ज्यामध्ये टक्केवारी, मध्यमान, मध्यांक, बहुलक, प्रमाण विचलन, क्रांतिक अंक (Critical Ratio) इ. साधनांचा उपयोग करण्यात येईल.

15) प्रकरण योजना :- १.प्रस्तावना

२. संबधित संशोधनाचा आढावा

३. संशोधन पद्धती

४ . माहितीचे अर्थनिर्वचन

५. सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

16) कालावधी :-

अ.क्र	संशोधन कार्य	कालावधी
१.	पूर्व संशोधनाचा आढावा	जुलै-२१ ते डिसेंबर-२१
२.	संशोधन विषय निश्चिती	जानेवारी-२२ ते जून-२२
३.	साधन विकसन	जुलै-२२ ते डिसेंबर -२३
४.	माहितीचे अर्थनिर्वचन	जानेवारी-२४ ते जून-२४
५.	अहवाल लेखन व सादरीकरण	जुलै-२४ ते डिसेंबर- २४

17) संदर्भग्रंथ सुची :-

- Ahuja, Ram. (2001): "Research Methodology", New Delhi, Rawat -Publication.
- Best, J.W. and Kahan J.V. (1998), Research in Education (7 th edition) Corporate Social and
- Glover, D. and Law, S. (1996): "Managing Professional Development in Education". London: Kogan.
- Haki Elimu (2004): "Professional Development for Educational Management", Bucknningham: Open University Press.
- Mark Halstead and Mark A. Pike (2006) Citizenship and Moral Education New York, Routlege publication.
- Michal Mason, (2005),The New Accountability, Routledge Publication
- Pandya, Shefali(2012), Research Methodology , New Delhi : APH Publishing Corporation.
- Sergiovanni T. S. and Robert J. Starratt. (1988): Supervision: "Human Perspectives". New York: Mc Graw Hill.
- अरविंद दूनाखे, 2008,शालेय व्यवस्थापन, प्रशासन, संघटन व नियोजन, नित्य नूतन प्रकाशन, कोल्हापूर
- आ. वि.कापरे, 2010,शैक्षणिक व्यवस्थापन, फडके प्रकाशन, कोल्हापूर
- बापट, गा. भो. (१९८८), शैक्षणिक संशोधन, पुणे, नूतन प्रकाशन.
- भिंताडे, वि. रा. (१९९९), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नूतन प्रकाशन.
- दांडेकर, वा. ना. (१९८५), शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
- महाले, सं. रा. (२००८), संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन : प्रात्यक्षिक कार्यपुस्तिका, नाशिक, य.च. म. मुक्त विद्यापीठ.
- मुळे, उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.
- ग.त. खुरपे, (2014), भारतीय शिक्षणप्रणाली आणि व्यवस्थापन, अरुणा प्रकाशन, लातूर

- क.य. घरमोडे, कला घोरपडे, (2006), भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान, विद्या प्रकाशन, नागपूर
- म.ल. जाधव, र. र. माने, (2006), शालेय व्यवस्थापन, फडके प्रकाशन, कोल्हापूर
- नीलिमा नारायण तिखे,2009, शैक्षणिक व्यवस्थापन व मूल्यांकन, इन्साइट प्रकाशन, नाशिक
- प्रीती पाटील, शारदा शेवतेकर, (2006), भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर
- ल.मा. शिवणेकर (1999), माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपद्धती, नूतन प्रकाशन, पुणे
- सु. भानुशाली, (2003), व्यवस्थापन शास्त्रातील आधुनिक संकल्पना, फडके प्रकाशन, कोल्हापूर

संशोधक

मेटकर वसंत आनंदराव

मार्गदर्शक

डॉ . माने मारुती शिवराम

प्राचार्य ,

एज्यूकेशन सोसायटी, नायगाव (बा.)

संचलित अध्यापक महाविद्यालय,नायगाव(बा.)